महत्त्वाचे

बिझनेस ॲनालिस्ट महिलेला ऑनलाईन सव्वा कोटींचा गंडा

ठाणे : ठाणे शहरातील एका उच्चभ्रू वस्तीतील एका बिजनेस एनालिस्टला सुमारे सव्वा कोटींचा ऑनलाईन गंडा घातल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी कासारवडवली पोलिस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वेय दोघांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. हिरानंदानी इस्टेटमध्ये राहणाऱ्या तक्रारदार या बिजनेस एनालिस्ट आहेत. त्या फेसबुकवर स्क्रोल करताना त्यांना शेअर मार्केट संदर्भात जाहिरात दिसली व तिथेच एक लिंक दिसली. त्यावर जॉइण्ड असे लिहिले होते. त्याच्यावर क्लिक करून ग्रुपवरती जॉइण्ड होण्यास सांगितले त्यानुसार जॉइण्ड झाल्या. ग्रुप ॲडमिन रोहन महेश्वरी आणि फायनान्शियल अडव्हासर विद्या सिंग यांनी संपर्क केला. ट्रेडींग ॲप्लीकेशन बद्दल माहिती देत, त्यातुन जास्त पैशांचे आमिश दाखवुन ट्रेडींग करीता प्राप्त लिंक देवुन व्हॉटसॲप ग्रुपमध्ये वेगवेगळ्या बँकांचा खाते क्रमांक पाठवुन त्यावर पैसे पाठविण्यास सांगितले. तसेच त्या ट्रेडींग करीता एकुण इन्व्हेसट केलेली रक्कम रुपये १ कोटी २३ लाख २९ हजार ९९५ अशी परत न करता ऑनलाईन आर्थिक फसवणुक केली असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. हा प्रकार २६ डिसेंबर २०२४ ते १२ जानेवारी २०२५ दरम्यान घडला असून याप्रकरणी गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास कासारवडवली पोलिसांनी दिली.

कासारवडवलीत आढळला युवतीचा मृतदेह

ठाणे : कासारवडवली परिसरातील मोकळ्या जागेत एका युवतीचा गळ्यात ओढणी घट्ट आवळून गुंडाळलेला मृतदेह आढळून आला आहे. ही आत्महत्या नसून ती हत्या असल्याचा प्राथमिक अंदाज ठाणे पोलिसांनी वर्तवला आहे. तिच्यावर अत्याचार झाला की नाही हे तिच्या शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होईल अशी माहिती पोलिसांनी दिली. कासारवडवली पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील शेडोबा मंदिर रोडकडे जाणाऱ्या रस्त्यालगत, रोनक ग्रुप कन्स्ट्रक्शन साईटच्या समोरील एका मोकळ्या जागेमध्ये १५ ते १७ वर्षीय युवतीचा मृतदेह शनिवारी (०५) आढळून आला. त्या युवतीच्या गळ्याला ओढणी घट्ट आवळून गुंडाळलेला होता. तसेच मृत युवतीही बांधकामाच्या ठिकाणी काम करणारी किंवा झोपडपट्टी राहणारी असावी. तिची गळा आवळूनच हत्या करण्यात आली आहे. तसेच त्या अनोळखी मृत युवतीच्या नातेवाईकांचा शोध सुरू केला असून त्यानंतर तिच्या मारेकऱ्यांचा शोध घेता येईल. असे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी कासारवडवली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक तुषार माने करत आहेत.

मुंबई, पुण्यात घरांच्या विक्रीत २७ टक्के घट

संपूर्ण देशातील सात महानगरांमध्येही घरांच्या विक्रीचा टक्का घसरला

ठाणे : पुढारी वृत्तसेवा

बांधकाम क्षेत्रात गेल्या तीन महिन्यात मोठी घडामोड झाली असून मुंबई आणि पुण्यासारख्या मोठ्या शरारांमध्ये घरांच्या विक्रीत कमालीची घट नोंदवली गेली आहे. पुण्यामध्ये तब्बल २७ टक्के आणि त्या खालोखाल मुंबईमध्ये २५ टक्के घरांच्या विक्रीत घट झाली असल्याची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे पुणे आणि मुंबईसह देशातील प्रमुख सात शहरांमध्येही घरांच्या विक्रीत घट नोंदवण्यात आली असून ऑपरेशन सिंदूर आणि इराण आणि इस्राईल यांच्यात झालेल्या युद्धामुळे घरांच्या विक्रीवर परिणाम झाला असल्याचे या क्षेत्रातील तज्ञांचे म्हणणे आहे.

देशातील प्रमुख शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्पांची कामे सुरु असून या प्रकल्पातून कोट्यवधींची गुंतवणूक करण्यात आली आहे. देशातील दिल्ली, हैद्राबाद, कोलकत्ता, चेन्नई, बंगळूर आणि महाराष्ट्रातील पुणे आणि मुंबई या प्रमुख शहरांमध्ये हे गृहप्रकल्प मोठ्या प्रमाणात सुरु असून याच प्रमुख शहरांमध्ये घरांच्या विक्रीतही घट नोंदवली गेली आहे. अनारॉक ग्रुपने यासंदर्भातील महत्वाचा अहवाल तयार केला असून या अहवालाच्या माध्यमातून ही माहिती समोर आली आहे. बांधकाम क्षेत्राचा अभ्यास करताना प्रामुख्यानेदेशातील या सात शहरांमधील गृहप्रकल्पांचा अभ्यास करण्यात आला आहे.

या अहवालानुसार एप्रिल, मे, जून या तीन महिन्यात गेल्यावर्षी १ लाख २० हजार घाटांची विक्री झाली होती. यावर्षी याच कालावधीत ९६ हजार घरांची विक्रीत झाली असून यामुळे या सात शहरांमध्ये तब्बल २० टक्के घरांच्या विक्रीत घट झाल्याचे उघड झाले आहे. याचा सर्वाधिक फटका पुणे आणि हैद्राबाद या ठिकाणी बसला असून या दोन्ही शहरांमध्ये २७ टक्के घरांच्या विक्रीत घट झाली असून इतर शहरांच्या तुलनेत हे प्रमाण सर्वाधिक आहे.

मुंबईत तीन महिन्यांत ३१ हजार २८५ घरांची विक्री

● बांधकाम क्षेत्राचा विचार केल्यास देशातील एकूण घरांच्या विक्रीचा विचार केल्यास मुंबई आणि पुणे शहरांचा वाटा हा साधारणतः ५० टक्के एवढा असण्याची शक्यता आहे. मुबंईत या तीन महिन्यात ३१ हजार २८५ घरांची विक्री झाली आहे. पुण्यात १५ हजार,बंगळुरु १५ हजार,दिल्ली १४ हजार, हैद्राबाद ११ हजार, चेन्नई ५ हजार ६००, कोलकत्ता ३ हजार ४०० एवढ्या घरांची विक्री झाली असून गेल्या वर्षी तीन महिन्याच्या कालावधीत ही विक्री २० टक्क्यांनी कमी असल्याने घरांच्या विक्रीबाबत बांधकाम क्षेत्रात चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

अँटॉप हीलच्या ९२८ गाळेधारकांना दिलासा

पुनर्विकास प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया सुरू

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

अँटॉप हील येथील ओम साई राम सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने पॅनेलवरील ३० विकासकांकडून निविदा मागवल्या आहेत. एकूण १३,८२० चौरस मीटर भूखंडावरील वसाहतीचा ३३(१०) अंतर्गत विकास होणार असून यामुळे मोठ्या प्रमाणावर निवासी आणि व्यावसायिक गाळे तयार होतील.

विकासकांना झोपडीधारकांची संमती घेणे आवश्यक नाही. विकासकांनी निविदा भरल्यानंतर त्यातून एका विकासकाची नियुक्ती या प्रकल्पावर केली जाईल. त्यानंतर पुनर्विकासाचा दर्जा आणि प्रगती यावर झोपु प्राधिकरणाकडून देखरेख केली जाणार आहे. प्रकल्पाचे सुरू करण्याआधी विकासकांना सर्व परवानग्या घेणे बंधनकारक असेल.

या प्रकल्पात ९२८ गाळे आहेत. यापैकी ८८३ गाळे निवासी आहेत तर इतर गाळ्यांमध्ये दुकाने, गृहनिर्माण संस्थेचे कार्यालय, समाजकल्याण केंद्र आणि प्राथमिक शाळा आहे.

पुढारी

शालेय परीक्षांसाठी अत्यंत उपयुक्त
संपूर्ण मार्गदर्शिका
हमखास यशाची गुरुकिल्ली म्हणजे PTSE

किंमत ₹.300/-

PUDHARI TALENT SEARCH EXAMINATION (PTSE)
प्रज्ञाशोध परीक्षा
सर्वांगीण शैक्षणिक विकास अभियान

महाराष्ट्रात शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये नावाजलेला राधानगरी-भुदरगड पॅटर्न.
शिष्यवृत्तीची पंढरी असलेल्या या पॅटर्नमधील तज्ज्ञ व अनुभवी
शिक्षकांच्या मार्गदर्शनाने परिपूर्ण अशी संपूर्ण मार्गदशिका.
इयत्ता चौथी ते आठवी च्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध

दैनिक पुढारीच्या मार्गदर्शिकेसोबत फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या प्रज्ञाशोध परीक्षेची तयारी करा.

सदरचा QR कोड स्कॅन करून पैसे भरा व त्याचा स्क्रीन शॉट
9923033440 या नंबरवर तुमच्या पत्त्यासह
WHATS APP करा, आठ दिवसांत पुस्तक कुरीयरमार्फत
घरपोच मिळेल.

www.pudhari.com E mail : ptsekop24@gmail.com

पुढारी
PUDHARI TALENT SEARCH EXAMINATION (PTSE)
प्रज्ञाशोध परीक्षा
सर्वांगीण शैक्षणिक विकास अभियान
संपूर्ण मार्गदर्शिका
SEARCH
मराठी
गणित
इंग्रजी
बुद्धिमत्ता
4 थी व 5 वी
6 वी व 7 वी
स्पर्धा परीक्षांसाठी अत्यंत उपयुक्त
हमखास यशाची गुरुकिल्ली म्हणजे PTSE
PTSE

मराठवाड्यात सहा नव्या वनस्पतींची नोंद

छत्रपती संभाजीनगर, लातूर जिल्ह्यात आढळल्या

छत्रपती संभाजीनगर : पुढारी वृत्तसेवा

मराठवाड्यात सहा नव्या वनस्पती आढळून आल्या असून लातूर जिल्ह्यातून रामवड (Ficus mollis), नागरी (Ximenia americana) या दोन वनस्पती तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून लघु अंजीर (Ficus johannis afghanistanica), सरडोळ (Sterculia villosa), पापट (Pavetta indica) व अत्यंत दुर्मिळ अशा संखिनी (Blastania cerasiformis) या रान काकडी वर्गातील वेलीचा त्यात समावेश आहे.

महाराष्ट्रातील मराठवाडा भाग हा तसा शुष्क प्रदेशात गणला जाणारा प्रदेश असला तरी इथे मोजक्याच शिल्लक वनक्षेत्रात अत्यंत संपन्न जैवविविधता आढळून येते. त्यातील अनेक वृक्ष , झुडूप वा वेलींची अद्याप नोंद झालेली नाही. लातूर जिल्ह्यातील रेणापूर येथील वनस्पती अभ्यासक शिवशंकर चापुले व छत्रपती संभाजीनगर येथील मिलिंद गिरधारी यांनी अलीकडेच केलेल्या अभ्यासात मराठवाड्यासाठी नव्या असलेल्या या सहा वनस्पतींची नोंद बायोइन्फोनेट या पेपरमध्ये होऊ शकली.

या संशोधनामुळे मराठवाड्यातील समृद्ध जैवविविधतेचे नवे पैलू समोर आले आहेत तसेच वनस्पतीशास्त्रज्ञांसाठी अभ्यासाच्या नवीन संधी निर्माण होऊन भविष्यातील संशोधनासाठी नवीन दिशा मिळणार आहे . लातूर जिल्ह्यातील या वनस्पतींच्या संशोधन कार्यात उदगीर येथील निसर्गप्रेमी अदिती पाटील याचेही सहकार्य लाभले आहे. वनस्पतीशास्त्रातील या नव्या संशोधनाबद्दल शिवशंकर चापुले, मिलिंद गिरधारी आणि मोनाल जाधव यांचे या क्षेत्रातील तज्ज्ञांनी अभिनंदन केले आहे.

> मराठवाड्यातील जंगलाचा नव्याने सखोल अभ्यास जैवविविधता संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असून या अभ्यासातून मराठवाडा वनस्पती कोषात नोंद न केलेल्या वनस्पतींची नोंद घेऊन खणउछ मार्फत मूल्यांकन न झालेल्या कोणत्या वनस्पती दुर्मिळ आहेत हे लक्षात येऊन अशा दुर्मिळ संकटग्रस्त वनस्पतींचे संवर्धन करता येणे शक्य होईल.
>
> - **मिलिंद गिरधारी,** वनस्पती अभ्यासक व संवर्धक

मराठवाड्यात या नव्या वनस्पतींच्या नोंदी बायोइन्फोनेट या पेपरमध्ये शास्त्रीयदृष्ट्या होणे ही वनस्पतीशास्त्रीय अभ्यासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण बाब होय. नव्याने शोध लागलेल्या या वनस्पतींमध्ये सरडोळ, नागरी व पापट या वनस्पती फारच दुर्मिळ असून पर्जन्यमानातील प्रचंड घट व अधिवास नष्ट होणे, अतिशोषण या कारणामुळे त्या दुर्मिळ झाल्या आहेत . ही बाब लक्षात घेऊन

छत्रपती संभाजीनगर येथील जनसहयोग संस्थेचे प्रशांत गिरे यांनी वरील सर्व दुर्मिळ वनस्पतींचे अधिवास बाह्य संवर्धन कार्य हाती घेतलेले असून ही संस्था भविष्यात वनविभागाच्या साह्याने प्रत्यक्ष अधिवासातही संवर्धन कार्य हाती घेणार आहे.राज्यातील जैवविविधता संवर्धनाचा महत्वाचा भाग म्हणून सर्व दुर्मिळ संकटग्रस्त व अती संकटग्रस्त वनस्पतींचे संवर्धन करण्यासाठी जनसहयोग संस्थेने व्यापक स्वरूपात कार्य हाती घेतलेले आहे, असे अध्यक्ष प्रशांत गिरे, जनसहयोग बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांनी सांगितले.

दुर्मिळ वनस्पतीचे संवर्धन कार्य करण्यासाठी महाराष्ट्रातील वृक्षप्रेमींनी संघटित होऊन कार्य करायला हवे. असे वनस्पती अभ्यासक व संवर्धक शिवशंकर चापुले यांनी सांगितले.

वागळेत चारचाकी गाड्यांवर पडले झाड

ठाणे : पुढारी वृत्तसेवा

ठाण्यात मुसळधार पाऊस थांबून थांबून हजेरी लावीत असतानाच ठाण्यात पडझडीचे घटनांना वेग आला असून विशेषतः एक आठवड्यापासून झाडे पडून नुकसानीच्या घटना वाढल्या आहेत. रविवारीही झाडं पडून वागळे इस्टेट परिसरात तीन चारचाकी वाहनांचे नुकसान झालेले आहे. वागळे इस्टेट, रघुनाथ नगर येथील रहेजा गार्डन जवळ पार्क केलेल्या ०३-चारचाकी वाहनांवरती झाड पडल्याची घटना रविवारी (ता.६) सकाळी सात वाजण्याच्या सुमारास समोर आली. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नसून त्या गाड्यांचे किरकोळ नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवानांनी धाव घेतली. तसेच पडलेले झाड कापून एका बाजूला केल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली. एक गाडी विवेक पोई यांच्या मालकीची असून अन्य दोन गाड्यांचे मालक अनोळखी आहेत. शहरात झाडे उन्मळून पडण्याची मालिका सुरू असल्याचे दिसत आहे.

सेंट्रल बँक ऑफ इंडिया
सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India

उत्तर मुंबई क्षेत्रीय कार्यालय
३रा मजला ,एनसीएल बिल्डिंग, प्लॉट नं.६,
ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्पलेक्स,
बांद्रा पूर्व, मुंबई - ४०००५१.
Email :
mmsro@centralbankofindia.co.in

भाडे तत्त्वावरील जागेसाठी बोली / प्रस्तावांचे आमंत्रण

सेंट्रल बँक ऑफ इंडियाला भाडे तत्वावर **खेरनगर शाखा, बांद्रे (पूर्व), मुंबई येथे १२०० ते १८०० चौरस फूट चटई क्षेत्र** असलेली जागा १ महिन्याच्या आत/ व्यावसायासाठी शक्यतो तळ मजल्या वर तयार असणे आवश्यक आहे. पुरेशा पार्किंगसह लगतच एटीएमसाठी जागा **खेरनगर शाखा, बांद्रे (पूर्व)** स्थलांतरासाठी आवश्यक आहे. कृपया कोणतेही दलाल अथवा मध्यस्थ आवू नये. शासकीय/निम शासकीय संस्था किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांना प्राधान्य दिले जाईल. कृपया **https://www.centralbankofindia.co.in** वेबसाइट किंवा सेंट्रल बँक ऑफ इंडिया नॉर्थ मुंबई रिजनल ऑफिस, तिसरा मजला, एनसीएल बिल्डिंग, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व, मुंबई ४०००५१ येथून फॉर्मेट/अटी आणि शर्ती डाउनलोड करता येतील. **दि. २८.०७.२०२५ (सोमवार) रोजी १७.०० वाजेपर्यंत "खेरनगर, बांद्रा (पूर्व) शाखेच्या परिसरासाठी सीलबंद निविदा"** असे लिफाफ्यावर नमूद करून अर्जरुपी लिफाफा तिसरा मजला, **एनसीएल बिल्डिंग, बांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व, मुंबई-४०००५१ येथे पोहोचला पाहिजे.**

प्रत्येक बोली रु. १०,०००/- प्लस जीएसटी १८% च्या दराने एकूण रु. ११,८००/-(रुपये अकरा हजार आठशे मात्र) बयाणा रकमेचा डिमांड ड्राफ्ट आवश्यक आहे. डिमांड ड्रॉफ्ट सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा नावे असले पाहिजे. कोणतेही कारण न देता कोणत्याही/सर्व ऑफर नाकारण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे.

स्थळ : मुंबई प्रादेशिक प्रमुख
दिनांक : ०६.०७.२०२५ उमुंक्षेका

नमुना इ-४
(नियम ११ पहा)

निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड पहिला मजला, सहकार भवन इमारत, स्टेडियम कॉम्प्लेक्स, जालना रोड, बीड अंतिम मतदार यादी : दि. [illegible]
सहकारी संस्थेचे नाव : दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक लि. परळी वैजनाथ जि. बीड [illegible] जि. बीड (महाराष्ट्र).

महाराष्ट्र सहकारी संस्था, (समितीचे निवडणूक) नियम [illegible] अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून मी सुमंत जनार्धन जाधव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक लि. परळी वैजनाथ जि. बीड यांच्या समितीच्या सदस्यांची [illegible]

अनुसूची

अ.क्र.	मतदार संघाचे नाव		नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठीची तारीख (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा व वेळ)	नामनिर्देशन पत्रांची सुची प्रसिध्द करणे	नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचा दिवस आणि वेळ व ठिकाण	वैध नामनिर्देशन पत्रांची सुची प्रसिध्दीची तारीख	उमेदवाराने नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याची तारीख	निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना चिन्हाचे वाटप व उमेदवारांची अंतीम यादीचे प्रकाशन तारीख	मतदान घेण्याची तारीख आणि वेळ आणि कोणत्या ठिकाणी घेणार	मतमोजी तारीख वेळ व स्थळ	मतदानाचे निकाल घोषित करण्याची तारीख
१	२		३	४	५	६	७	८	९	१०	११
१	सर्वसाधारण मतदार संघ	१२	दि. [illegible] ते दि. [illegible] सकाळी ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात)	दि. [illegible] ते दि. [illegible] जस अर्ज प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज दु. ३.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात)	दि. [illegible] सकाळी ११.०० पासून छाननी संपेपर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात)	दि. [illegible] सकाळी ११.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात)	दि. [illegible] ते दि. [illegible] सकाळी ११.०० ते दु. ३.०० पर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात)	दि. ३०/[illegible] सकाळी ११.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात)	दि. [illegible] वेळ सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत ठिकाण नंतर कळविण्यात येईल.	दि. [illegible] वेळ सकाळी ८.०० वाजल्यापासून ठिकाण नंतर कळविण्यात येईल.	दि. [illegible] मतमोजणी संपल्यानंतर लगेच
२	अनुसूचित जाती/जमाती	०१									
३	इतर मागासवर्गीय	०१									
४	भटक्या विमुक्त जाती/जमाती व विमाप्र	०१									
५	महिला प्रतिनिधी	०२									
	एकूण	१७									

[illegible] askadam6969@gmail.com
[illegible]

शिक्का

स्वाक्षरित
(सुमंत जाधव)
निवडणूक निर्णय अधिकारी
दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक लि. परळी वैजनाथ जि. बीड

स्वाक्षरित
(सुमंत जाधव)
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड

स्वाक्षरित
(अशोक गाडे)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत,
[illegible]